# वसई विरार शहर महानगरपालिका

**मा. सर्वसाधारण सभा दिनांक १९ /०९/२०१८**

**सभा सुचना क्रं. ०४ सायं ४.३० वा.**

| | विषयाचे नाव | मा. सर्वसाधारण सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १. | मागील मा. सर्वसाधारण सभा दि. २०/०८/२०१८ ची तहकुब सभा दि.२८/०८/२०१८ रोजीचे इतिवृत्त कायम करणे. | ठराव :- मागील मा. सर्वसाधारण सभा दि. २०/०८/२०१८ ची तहकुब सभा दि. २८/०८/२०१८ रोजीचे इतिवृत्त कायम करणेंत येत आहे.<br>अनुमोदक :- (चंद्रकांत गोरीवले) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>**प्रस्ताव सर्वानुमते मंजूर.** |
| २. | प्रश्नोत्तरे | निरंक |
| ३. | शासकीय पत्रव्यवहार माहितीस्तव. | ठराव :- प. रेल्वेचे दि. २१/०८/२०१८ चे उपरोक्त पत्रावर कार्यवाही करणेंचे अधिकार सन्मा.महापौर महोदय यांना प्रदान करण्यास ही सभा एकमताने मंजूरी देत आहे.<br>अनुमोदक :- (उमेश दत्तात्रेय नाईक) सुचक :- (पंकज भास्कर ठाकूर)<br>**प्रस्ताव सर्वानुमते मंजूर.** |
| ४. | श्रीम. आशा हरेश वेगडा यांची वारसाहक्काने "सफाई कामगार" पदावर नियुक्ती करणेबाबत. | ठराव/निर्णय :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती - सी, चंदनसार येथील कर्मचारी श्री. जगदीश माना सोलंकी, सफाई कामगार हे दिनांक दि. ३०/०४/२०१८ रोजी महानगरपालिका सेवेतून रुग्णता सेवानिवृत्त झालेले असुन त्यांची मुलगी श्रीमती आशा हरीश वेगडा (वय ३३ वर्षे, ५ महिने) यांना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचेकडील शासन परिपत्रक दिनांक २१ ऑक्टोबर, २०११, शासन परिपत्रक दिनांक २६ फेब्रुवारी, २०१४ व शासन निर्णय दिनांक ११ मार्च, २०१६ मधील तरतुदीनुसार वारसाहक्क नियुक्तीसाठी पात्र असल्याने त्यांना लाड समितीच्या शिफारसीनुसार वारस हक्काने महानगरपालिका सेवेत "सफाई कामगार" या पदावर सामावुन घेणेस आजची ही महासभा मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- (नरेंद्र पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

| | | |
|---|---|---|
| ५. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती ई नालासोपारा आस्थापनेवरील कर्मचारी श्री सुनिल रामचंद्र जाधव सफाई कामगार यांना रुग्णता सेवा निवृत्ती देणेबाबत. | ठराव निर्णय :- वसई-विरार शहर महानगरपालिकेतील कर्मचारी श्री. सुनिल रामचंद्र जाधव,सफाई कामगार प्रभाग समिती ई नालासोपारा यांना दि. ३०/०९/२०१८ रोजी मध्यान्होत्तर महाराष्ट्र नागरी सेवा(निवृत्ती वेतन) नियम १९८२ नियम ८० अन्वये रुग्णता सेवा निवृत्ती करणेस मान्यता आहे. श्री सुनिल रामचंद्र जाधव,सफाई कामगार यांना रुग्णता सेवानिवृत्तीनंतर दयावयाचे अनुषंगिक लाभ अदा करणेस आजची ही सभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (किशोर ग. पाटील ) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ६. | सुनिल गणपत चौधरी वसुली कारकुन यांचे सेवा निवृतीचा आदेश रद्द करुन त्यांना सेवेत पुनः स्थापित करणेबाबत. | ठराव/निर्णय :- उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा करण्यात आली श्री. सुनिल गणपत चौधरी यांचे सेवासंदर्भातील उपलब्ध दस्तांची सविस्तर पडताळणी करावी त्यांना अदा केलेले वेतन व ते धारण करीत असलेले पद यांची खातरजमा करुन आवश्यक असल्यास रितसर प्रस्ताव महासभेसमोर सादर करावा सबब सुनिल गणपत चौधरी वसुली कारकुन यांचे सेवानिवृत्तीचा आदेश रद्द करुन सेवेत पुन:स्थापित करुन घेणे करीता आलेला प्रस्तावावर प्रशासकीय स्तरावर निर्णय घ्यावा अशी आजची सभा ठरवित आहे.<br>**अनुमोदक :- (विद्या पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ७. | श्री. प्रदीप आत्माराम जाधव फायरमन यांची आई सौ.चंद्रभागा आत्माराम जाधव यांची वैदयकिय खर्चाची देयके अदा करणेस मंजूरी मिळणेबाबत. | निर्णय :- महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम १९६१ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित झालेल्या निर्णयास अधिन राहून व तसेच महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभागाकडील शासन निर्णय क्रमांक वैखप्र-२०१६/प्र.क्र.१६/२०१६ राकावि-२ दिनांक १६ मार्च, २०१६ अन्वये वसई विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती आय, वसई कार्यालयातील कर्मचारी श्री.प्रदिप आत्माराम जाधव यांची आई श्रीमती चंद्रभागा आत्माराम जाधव दिनांक १५/७/२०१७ ते दि.२७/७/२०१७ या कालावधीत जनसेवा हॉस्पिटल वसई (प.) येथे शस्त्रक्रिया व औषधोपचारासाठी झालेला एकूण खर्चापैकी त्यांना अनुज्ञेय असणारी एकूण निव्वळ रक्कम रु. १,२०,४३३/- वैद्यकीय प्रतिपूर्ती करणेस ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे.<br>**अनुमोदक :- (प्रविण शेट्टी) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ८. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती सी चंदनसार आस्थापनेवरील कर्मचारी श्रीमती जमना लक्ष्मण कातकरी "सफाई कामगार" यांना रुग्णता सेवा निवृत्ती देणेबाबत. | ठराव/निर्णय :- वसई विरार शहर महानगरपालिकेतील कर्मचारी श्रीमती जमना लक्ष्मण कातकरी, सफाई कामगार, प्रभाग समिती- सी, चंदनसार यांना दि. ३०/०९/२०१८ रोजी मध्यान्होत्तर महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ चा नियम ८० अन्वये रुग्णता सेवानिवृत्त करणेस मान्यता आहे. तसेच श्रीमती जमना लक्ष्मण कातकरी यांना रुग्णता सेवानिवृत्तीनंतर दयावयाचे अनुषंगिक लाभ अदा करणेस आजची ही सभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (नरेंद्र पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

| | | |
|---|---|---|
| ९. | प्रभाग समिती आय कार्यालय क्षेत्रातील वॉर्ड क्र ११० मध्ये तरण तलावास बंदीस्त शेड इले.वर्क्स व अन्य उर्वरीत कामे करणे (सिव्हील व वर्क्स, इलेक्ट्रीफिकेशन्स व शेड) कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत. | ठराव /निर्णय :- वरील विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करणेत आली. वरील कामी तयार करणेत आलेल्या रु. २,३९,९७,६३३/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे. त्यानुसार सदर कामाचे अंदापत्रकास आवश्यक तांत्रिक मंजूरी घेवून निविदेची कार्यवाही करणेस, तसेच त्याकामी अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगीक खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.<br><br>अनुमोदक :- (प्रविण शेट्टी) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| १०. | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती जी येथील वॉर्ड क्र.४८ मध्ये सेवालाल नगर मधील सेवालाल चाळ सी विंग ते परेश पाटील चाळ पर्यत आर सी सी सरंक्षण भिंत बांधणे कामी अंदाजपत्रकिय रक्कमेस प्रशासकिय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत. | ठराव/निर्णय :- वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमुद कामी होणाऱ्या खर्चास रक्कम रु.८२,४३,४४७/- इतक्या रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्यात येत आहे तसेच पुढील निविदा कार्यवाहीस मान्यता देण्यात येत आहे.<br>अनुमोदक :- (कन्हैय्या भोईर) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| ११. | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील महापालिकेच्या मालकिच्या बोरवेल देखभाल दुरुस्तीसाठी संबंधित परिसरातील नागरीकांची कमिटी/संस्था/समुहाकडे हस्तांतरीत करण्याच्या निर्णयास्तव प्रस्ताव ठेवण्यास मंजूरी मिळणेबाबत. | ठराव / निर्णय :- वरील विषयाबाबत सविस्तर चर्चा होवुन असे ठरविण्यांत आले की, महानगरपालिका क्षेत्रातील ग्रामिण भागातील, आदिवाशी पाडे, दलित वस्त्या इत्यादी भागातील बोअरवेलचे सर्वेक्षण करुन त्या नागरीकांची कमिटी / संस्था /समुहाकडे हस्तांतरीत करुन घेणार नसल्यास त्या महानगरपालिकेमार्फत दुरुस्ती करण्यांत याव्यात. तसेच शहरी भागातील बोअरवेल नागरीकांची कमिटी / संस्था / समुहाकडे हस्तांतरीत कराव्यात, जर बोअरवेल हस्तांतरीत करुन घेणार नसल्यास व त्या ठिकाणी ग्रुप कनेक्शन दिले असल्यास अशा बोअरवेल कायमस्वरुपी बंद कराव्यात . ज्या भागात महानरगपालिकेची वितरण जलवाहीनी आहे अशा भागातील बोअरवेल बंद कराव्यात. ग्रामिण भागातील नादुरुस्त होणाऱ्या बोअरवेल दुरुस्तीसाठी आवश्यक मंजुरी घेवुन निविदा कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.<br>अनुमोदक :- (पंकज पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |

| | | |
|---|---|---|
| १२. | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील २०,०००चौ.मीटर किवां त्यापेक्षा जास्त बांधकाम क्षेत्र विकसित करणाऱ्या गृह प्रकल्प विकसित करणाऱ्या विकासकांकडून STP साठी शुल्क आकारणी करणेबाबत. | ठराव / निर्णय :- सदर विषयावर सविस्तर चर्चा होवुन असे ठरविण्यांत आले की, वसई - विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील २०,००० चौ. मीटर किंवा त्यापेक्षा जास्त बांधकाम क्षेत्र विकसीत करणाऱ्या गृह प्रकल्प करणाऱ्या विकासकांकडुन STP साठी आरक्षीत जागा महापालिकेकडे हस्तांतरीत करुन घेण्यास, STP साठी प्रकल्प उभारणे कामाचे अंदाजीत खर्च तसेच देखभाल - दुरुस्ती खर्च (५ वर्षाचा ) घेण्यास हि सभा मान्यता देत असुन पुढील कार्यवाहीचे अधिकार मा. आयुक्त यांना प्रदान करण्यात येत आहे.<br>अनुमोदक :- (सखाराम महाडिक) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| १३. | सन २०१८-१९,२०१९-२० व २०२०-२१ या त्रैवार्षिक वित्तीय वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका पाणी पुरवठा सुर्या उद्‌भव (टप्पा- १ व ३) १०० द.ल.ली क्षमता योजनेच्या मासवंन व धुकटन येथील सब स्टेशन इलेक्ट्रीक पॅनेल पपींग मशीनरी व जलशुध्दीकरण केद्रांमधील यांत्रिकी बाबींची देखभाल दुरुस्ती करणे कामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. | ठराव/निर्णय :- वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमुद कामी त्रैवार्षिक अंदापत्रकीय रक्कमेस प्रशासकिय व वित्तीय मंजूरी देण्यात येत आहे व पुढील ई-निविदा कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.<br>अनुमोदक :- (अजीत नाईक) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| १४. | दि.२७/०७/२०१८ रोजीच्या मा.परिवहन समिती सभेमध्ये निश्चित केलेल्या प्रवासी दरास अंतीम मंजुरी मिळणेबाबत. | ठराव/ निर्णय :- उपरोक्त सादर केलेल्या तक्ता क्र. ३ मधील दरवाढ करणेस वसई विरार शहर महानगरपालिकेच्या परिवहन समितीने केलेली शिफारस पाहता आजची सर्वसाधारण सभा वरील तक्ता क्र.३ मध्ये शिफारस केलेल्या दरवाढीस अंतिम मंजूरी प्रदान करीत आहे.<br>अनुमोदक :- (चंद्रकांत गोरीवले) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |

| | | |
|---|---|---|
| १५ | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मालमत्ताधारकांना घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ नुसार उपभोक्ता कर लागु करुन वसुली करण्यास मान्यता मिळणेबाबत. | निणर्य / ठराव :- उपरोक्त विषयाबाबत सविस्तर चर्चा होवुन असे ठरविण्यांत आले की, घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ नुसार महानगरपालिका कार्यक्षेत्रातील घरगुती मालमत्तांना रु. ५० प्रती वर्ष, बिगर घरगुती रु. ५०० प्रती वर्ष व खाजगी सेवा पुरविणाऱ्या संस्था रु. १५० प्रती वर्ष या प्रमाणे उपभोक्ता कर आकारणी करण्यास, सदर उपभोक्ता कर मालमत्ता कराच्या मागणी देयकात पुढील वित्तीय वर्षापासुन समाविष्ठ करुन त्याची वसुली करण्यास हि सभा मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- (रमेश घोरकना) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| १६ | वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील मौजे डोंगरे येथील सनं.९८/१ व सानं.१०४/२ब या जागेवरील "हायस्कूल आरक्षण क्रमांक २२१" व "प्रायमरी स्कूल आरक्षण क्र.२२२" या जागेवर मे. नॅशनल ऐज्यूकेशन सोसायटीला हायस्कूल व प्रायमरी स्कूल बांधण्यास नाहरकत/परवानगी देणेबाबत. | ठराव :- वरील नमूद नुसार प्रायमरी स्कूल व हायस्कूल हे आरकक्षण विकसित करण्यासाठी शासन निर्णय क्र. टिपीएस-१८१३/३०६७/प्र.क्र.४९२/१३/मनपा/नवि-१३ दि.०२/०५/२०१६ अन्वये मंजूर करणेंत आलेल्या समावेश आरक्षण (Accomodation Reservation) धोरणानुसार अंमलबजावणी करणेकामी असलेल्या एकूण तरतूदी मधील "The owner may beallowed to develop the reservation for the same purpose. The Registered public Educational Institution trust on behalf of owner may be allowed to be develop subject to terms/conditions asprescribed by the Planning Authority " या तरतुदीनुसार जमिन मालक किंवा नोंदणीकृत सार्वजनिक शैक्षणिक संस्था ट्रस्ट हा मालकातर्फे सदरचे आरक्षणाच्या जागेत विकास करणे कामी ही महासभा खालील अटी-शर्तीवर मान्यता देत आहे.<br>सदर प्रायमरी स्कूल व हायस्कूल हया आरक्षणाचे एकूण एकत्रित नियोजन (Master Plan) करुन अर्जदार यांच्या आरक्षणाखालील मालकीच्या जागेमध्ये बांधकाम परवानगी देण्यास मान्यता देत आहे.<br>सदर आरक्षण विकसित करण्याच्या अनुषंगाने विकासकावर बंधनकारक करणेच्या शर्ती व अटी स्थायी समितीने निश्चित करणेस ही सभा मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- (उमेश नाईक) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| १७. | वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील बोळींज येथील मलशुध्दीकरण केंद्रात तृतीय स्तरीय प्रक्रिया केंद्र उभारणे. | ठराव / निर्णय :- उपरोक्त विषयाबाबत सविस्तर चर्चा होवुन असे ठरविण्यांत आले की, दुय्यम मलशुध्दीकरण प्रक्रियेनंतर अतिमतः प्राप्त होणाऱ्या पाण्यावर शासन निर्णयानुसार तृतीय स्तरीय प्रक्रिया करणे आवश्यक असल्याने सदर कामी तयार करण्यांत आलेल्या अंदाजपत्रकीय रु. १८.३७ कोटी खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत असुन सदर कामी ई - निविदा मागविण्यास मंजूरी देण्यांत येत आहे. तसेच तृतीय स्तरीय प्रक्रियेनंतर उपलब्ध होणारे पाण्याची गुणवत्ता चाचणी घेवुन प्रस्तावात नमुद केल्यानुसार पुर्नःवापरास हि सभा मंजूरी देत आहे.<br>अनुमोदक :- (सखाराम महाडिक) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |

| | | |
|---|---|---|
| १८. | <u>खोलसापाडा -२, ता.वसई जि. पालघर हा प्रकल्प पुर्ण ठेव तत्वावर राबविण्यास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.</u> | ठराव / निर्णय :- सदर विषयावर सविस्तर चर्चा होवुन असे ठरविण्यांत आले की, खोलसापाडा - २ ता. वसई, जि. पालघर हा प्रकल्प पुर्ण ठेव तत्वावर पाटबंधारे विभागामार्फत राबविण्यास तसेच सदर कामी अंदाजपत्रकीय रु. ३५ कोटी ( पाटबंधारे विभागाच्या दि.२२/०६/२०१८ च्या पत्रान्वये कळविले नुसार ) खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर कामी कोंकण पाटबंधारे विकास महामंडळासोबत सामंजस्य करार करण्यास हि सभा मंजूरी देत असून सदर कामी पुढील आवश्यक कार्यवाही करण्याचे अधिकर मा. आयुक्त यांना प्रदान करण्यांत येत आहेत.<br>अनुमोदक :- (चंद्रकांत गोरीवले) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |

नगरसचिव

वसई विरार शहर महानगरपालिका